## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष

## निशाणी क्र. ०७ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – राम वसंत कोळी,

वय – ३९ वर्षे,

व्यवसाय – मजुरी,

राहणार – निंबा चौक, दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दिनांक २२.०६.२०२३ रोजी मला पोलीसांनी बोलाविले नव्हते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) त्याच्यावर अ. क्र. १ कडील सही माझी नाही. पंचनाम्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. त्यादिवशी मी पंचनाम्याकरीता घटनास्थळावर गेलो नव्हतो. त्यादिवशी पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला नव्हता.

(सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतली. तशी अनुमती देण्यात येते.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.०६.२०२३ रोजी पोलीसांनी पंचनाम्याकरीला पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत गुप्त बातमी मिळाली होती की, अंजुम टॉकीजजवळ एक महिला गावठी हातभटी दारुची विक्री करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याकरीता पंच म्हणुन राहण्यास तयार झालो. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी व दुसरा पंच पोलीसांसह असे

घटनास्थळी छापा टाकण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी एक महिला प्लॅस्टीकचे दोन कॅन व एक मग घेवुन बसलेली आम्हाला दिसुन आली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना बातमीची खात्री झाल्याने त्यांनी माझ्यासमोर छापा टाकला व सदर महिलेस जागीच पकडले. हे म्हणणे खरे नाही की,त्या महिलेने तिचे नांव पकडल्यावर लक्ष्मी गणेश गारुंगे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, तिच्या कब्ज्यात ३० लिटर गावठी हातभटीची दारु पोलीसांना मिळुन आली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मुद्देमाल दारु जप्त करुन मुद्देमालातुन १८० मि.ली दारु काचेच्या बाटलीमध्ये सी. ए. तपासणीकरीता नमुन्या दाखल काढुन घेतली व आम्हा पंचांच्या आणि स्वतच्या सहयांचे लेबल लावुन सिल केली. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरीत मुद्देमाल दारु माझ्यासमोर नष्ट करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष तेथे दिसत्या वस्तुस्थिती प्रमाणे घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा तयार केला होता व तो वाचुन पाहुन बरोबर असल्याने मी त्याच्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. बी. पवार यांचे मार्फत.</u>**

**उलटतपास नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.02.17 11:09:35 +0530

दिनांक : १६/०२/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – १७.०२.२०२६. |

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)